पैगंबर आणि मुस्लिमेतर विद्वान

लेखक

इमामुद्दीन रामनगरी

भाषांतर

मुबारक हुसेन मनियार

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

प्राक्कथन

मुस्लिम तर पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुयायी आहेतच. ते त्यांना महानतम व अंतिम ईशदूत मानतात. आणि ते त्यांच्या प्रत्येक वचन, प्रत्येक कार्य व प्रत्येक शिकवणीवर पूर्ण विश्वास ठेवतात. त्यांनी पैगंबरांवर (ईशदूत मुहम्मद (स.) यांच्यावर) कितीही श्रद्धा ठेवली व त्यांची कितीही प्रशंसा केली तरी कमीच आहे. परंतु पहावयाची गोष्ट अशी आहे की मुस्लिमेतर विद्वान पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासंबंधी काय म्हणतात?

या पुस्तकाचे हेच वैशिष्ट्य आहे की लेखक महोदयांनी यात आपल्याकडून काहीही लिहिले नाही, केवळ भारत व युरोपातील मुस्लिमेतर विद्वानांची मते व त्यांचे कथन एकत्रित केलेले आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासंबंधी ज्या मुस्लिमेतरांचे ज्ञान त्रुटीपूर्ण आहे अथवा जे अनुदार आहेत त्यांची तर गोष्टच वेगळी आहे, परंतु त्यांच्या संबंधानेदेखील हे म्हटले जाऊ शकत नाही की त्यांच्यात कोणतीही उणीव अथवा दोष नाही, किंवा जसे की तेसुद्धा मुस्लिमांप्रमाणेच पैगंबर मुहम्मद (स.) यांचे प्रत्येक वचन, प्रत्येक कार्य व प्रत्येक आदेश पूर्णपणे मान्य करतात. आणि मुस्लिमांप्रमाणेच त्यांच्यावर श्रद्धा ठेवतात. जर असे असते तर त्यांच्यात व मुस्लिमांत अंतरच काय उरले असत? शिवाय आपण पाहाल की या विद्वानांचे ज्ञान अधिक असो की कमी, ते उदार असोत किंवा अनुदार सर्वांनी पैगंबर साहेबांच्या गुणांचा व त्यांच्या सचोटीचा स्वीकार केला आहे आणि सर्वांनी त्यांच्या महान व्यक्तित्व, महान कार्य व महान शिकवणींची प्रशंसाच केलेली आहे.

मुस्लिमेतर बंधुंना पैगंबर मुहम्मद (स.) यांचा परिचय व्हावा या उद्देशाने या पुस्तकाची रचना केली गेली आहे. मुस्लिमांना या पुस्तकाने एक विशेष प्रकारची माहिती प्राप्त होईल. त्यांचे कर्तव्य आहे की त्यांनी या पुस्तकाचे स्वतः वाचन करावे व आपल्या सुशिक्षित मुस्लिमेतर मित्रांना वाचण्यास प्रवृत्त करावे.

- अबू मुहम्मद इमामुद्दीन

इस्लामच्या पैगंबरांची वास्तविकता

प्रत्येक विषयाच्या मुळाशी पोचण्याची नैसर्गिक प्रवृत्ती

'इन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या रचनाकारांनी लिहिले आहे -

''पैगंबर मुहम्मद (स.) जरी पूर्णपणे अशिक्षित होते व अरबी भाषेच्या काव्य-कलेपासून इतके अनभिज्ञ होते की कोणत्या न कोणत्या त्रुटिशिवाय एक शेर (काव्याच्या दोन ओळी) देखील ते सांगू शकत नव्हते. तरीसुद्धा स्वभावतः प्रत्येक विषयाच्या मुळापर्यंत पोचण्याची त्यांची नैसर्गिक प्रवृत्ती होती. या गोष्टीचा संकेत देताना पवित्र- कुरआनच्या एका सुप्रसिद्ध सूरह (पवित्र कुरआनचे एक प्रकरण) मध्ये त्यांना संबोधून असे म्हटले गेले आहे -

''पैगंबर मुहम्मद (स.) यांना काव्य-विद्या प्रदान करण्यात आली नसून त्यांनी कवी असणेदेखील आवश्यक नाही.''

ही गोष्ट सर्वसिद्ध आहे की पैगंबर मुहम्मद (स.) (यांच्यावर ईश्वराची दया आणि कृपा असो) यांना लिहिणे-वाचणे अजिबात येत नसे आणि हेदेखील एक ऐतिहासिक सत्य आहे की ते पैगंबर होईपर्यंत कोणत्याही धर्माचा कोणताही ग्रंथ त्यांच्यापर्यंत पोचला नव्हता. याशिवाय विचारणीय गोष्ट अशी आहे की अशा विद्या व ज्ञानशून्य देश व जातीत जन्म घेऊन व त्याच वातावरणात तरूण होऊनदेखील त्यांनी इतक्या महान सार्वभौम व विश्वव्यापी धर्माचे प्रवर्तन केले. एका देशात एवढी मोठी क्रांती निर्माण केली, त्यांनी प्रवर्तीत केलेल्या धर्माने जगातील सर्व देशांवर, सर्व जाती व सर्व सभ्यतांवर वेळोवेळी प्रभाव टाकला. भारतासारखा धर्म, संस्कृती, विद्या व ज्ञानाने परिपूर्ण व संपन्न देशदेखील इस्लामच्या प्रभावापासून अलिप्त राहू शकला नाही आणि त्यांच्यानंतर आजतागायत कोणताही इतका महान धर्म-नेता जन्माला आला नाही. सर्व पैलूंचा विचार केल्यानंतर हे मान्य करणे भाग पडते की ते ईश्वराचे पैगंबर होते आणि त्यांचे ज्ञान हे ईशज्ञान होते.''

अत्यंत तेजस्वी पुरुष

एक ख्रिश्चन विद्वान मिस्टर मुल्लर पैगंबर मुहम्मद (स.) यांना पैगंबर न मानणाऱ्या लोकांना प्रश्न करतो -

''हे कसे शक्य आहे की एक धार्मिक ज्वाला जी जरी एका जंगलात प्रज्वलित

झाली होती, परंतु जिने इतक्या अल्पावधीत आश्चर्यजनक रीतीने संपूर्ण आशिया खंडात अग्नीचा डोंब उठविला, ती अशा हृदयातून निघालेली असेल ज्यात त्याची काहीही उष्णता अस्तित्वात नसेल?'' (एजाजुत्तंज्रील, पृ.१२४, बहवाला 'इन्सायक्लोपीड़िया ब्रिटानिका - विषय : पैगंबर मुहम्मद (स.) व त्यांचा धर्म)

असामान्य शक्ती-संपन्न मनुष्य

मिस्टर टॉम्स कार्यालय पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर खोटे दोष लावणाऱ्या लोकांचा खरपूस समाचार घेताना लिहितो -

''होय, असे कदापि नाही, हा तीक्ष्ण दृष्टीचा मनुष्य जो जंगली देशात जन्मला होता, जो मनमोहक काळे डोळे व प्रफुल्ल, शिष्टतापूर्ण व विचारशील स्वभावाबरोबर आपल्या मनात मान-सन्मानाच्या इच्छेविरुद्ध काही अन्य विचार बाळगत होता, तो एक शांतिमय आणि असामान्य शक्तिशाली आत्मा होता आणि त्या लोकांपैकी होता जे सत्यवान असण्याशिवाय अन्य काही असूच शकत नाहीत. ज्याला स्वत: निसर्गाने खरा व सत्यप्रिय म्हणून जन्मास घातले होते. या काळात अन्य लोक अंधविश्वास व संस्कारांचे पालन करीत होते आणि त्यावरच संतुष्ट होते. हा मनुष्य त्या विश्वास व संस्कारांचे पालन करू शकत नव्हता व आपला आत्मा व पदार्थांच्या तथ्यांच्या ज्ञानाविषयी तो अन्य लोकांपेक्षा भिन्न होता. जसे की मी वर्णन केले आहे की, सर्वशक्तिमानाचे रहस्य आपल्या प्रताप व सौंदर्यासह त्यावर प्रकट झाले होते आणि या तथ्यावर ज्याचे वर्णन करण्यास वाक्शक्ती असमर्थ आहे आणि ज्याने आपल्यासाठी 'मी येथे आहे' म्हणून प्रयोग केला. प्राचीन कथा त्यावर पडदा घालू शकल्या नाहीत आणि असले सत्य ज्यास एखादे पर्यायी श्रेष्ठतर शब्द न मिळाल्यामुळे आम्ही 'सत्य' नाव ठेवले आहे, ते वास्तविकत: ईशचिन्हांपैकी एक चिन्ह आहे. अशा माणसाचे कथन एक वाणी आहे जी एखाद्या संबंधाविना थेट ईशप्रकृतीच्या हृदयातून निघते, जी मानव ऐकतात आणि जी ऐकण्यासाठी व वस्तूंच्या तुलनेसाठी अधिक लक्ष देण्याची गरज आहे, कारण याच्या तुलनेत जे काही आहे तुच्छ आहे. सुरवातीपासूनच त्याच्या हृदयात हजप्रसंगी व दररोज इकडे-तिकडे भ्रमण करताना त्यांच्या मनात विभिन्न प्रकारचे हजारो विचार येत असत. उदाहरणार्थ - ''मी काय आहे? लोक ज्याला जग म्हणतात व ज्यात मी राहतो ही अथांग गोष्ट काय आहे? जीवन काय आहे? मृत्यू काय आहे? मला कोणत्या गोष्टीवर विश्वास ठेवला पाहिजे व काय केले पाहिजे?'' ज्याचे उत्तर

(मक्काच्या) हिरा व (सीरियाच्या) सीना पर्वताच्या मोठमोठ्या दगडांच्या ढिगाऱ्यांची व निर्मम निर्जन वाळवंटाने व जंगलाने काहीही दिले नाही आणि डोक्यावर गुपचूप प्रदक्षिणा घालणाऱ्या आकाशानेसुद्धा आपल्या निळा प्रकाश देणाऱ्या नक्षत्रांसह काहीही सांगितले नाही. परंतु जरी कुणी सांगितले असेल तर केवळ त्याच्याच आत्म्याने व ईश्वरी ज्ञानाने सांगितले जे त्याच्यात होते.''

(एजाजुत्तंजील, पृ.१२५-१२६)

प्रेम व ममता, शौर्य व वीरतेचा असीम आवाज

जर्मन इतिहासकार डोश लिहितो -

''हर्ष व विषाद प्रेम व ममता, शौर्य व वीरतेची ती विशाल पुकार जिचा तरल ध्वनि आमच्या कानात प्रवेश करतो ती पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काळात पूर्ण आवाज बाळगत असे. पैगंबर मुहम्मद (स.) यांना सर्वात जास्त सुभाष्य व उच्च-भाष्य लोकांशी केवळ बरोबरीचे करावी लागेली नाही तर त्यांच्यावर श्रेष्ठत्वदेखील प्राप्त करावे लागले आणि आपल्या कथनाच्या सुभाष्यतेला व उच्चतेला आपल्या प्रेषित्वाच्या दाव्याचा पुरावा म्हणूनदेखील सिद्ध करावे लागले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यापूर्वी कवींनी विपुल प्रमाणात प्रेम काव्याची रचना केलेली होती. अन्तराने प्रेमीच्या दशेचे चित्रण एका प्रसिद्ध कथेत केले होते. ज्याला पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अरबस्थानच्या कवींचा सरदार परंतु नरकवासियांचा नेता म्हणून संबोधिले, त्या 'इमरुलक़ैस' ने प्रेमाच्या नितांत उच्च व दिव्य-कोटीच्या पदांची रचना केली होती आणि मद्यपान व चंद्रमुखी, रजतवदनी प्रेमिकांच्या प्रशंसेत भाषेची सुलभता व अलंकाराची नदी प्रवाहित केली होती. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांनी प्रेम-काव्यही छंदबद्ध केले नाही. या नश्वर जगातील सुख-दुखांना छंदबद्ध केले नाही. अरबस्थानाच्या पाणीदार तलवारीची चमक, वेसणधारी उंट किंवा अरबस्थानातील ईर्ष्या, द्वेष व सूड उगविण्याची इच्छा अथवा एखाद्या जाती व घराण्याच्या बापजाद्यांच्या शौर्य कथांना त्यांनी छंदबद्ध केले नाही की एखादे विशेष वर्णन केले नाही की ज्या योगे हे ज्ञात व्हावे की त्यांच्या दृष्टीने मानव शरीरात काहीही तथ्य नाही. व त्याच्या नशिबी केवळ विनाश आहे. सारांश असा की त्यांनी लोकांना कविता व वाङ्मय प्रकार शिकविले नाहीत तर त्यांना इस्लाम शिकविले व अशाप्रकारे शिकविले की पृथ्वी व आकाशाला भेटून स्वर्ग व नरकाला साकार करून दाखविले.'' (एजाजुत्तंजील, पृ. ६३)

गुलामांचा उद्धारकर्ता

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काळात यहुदी (ज्यू) व इसाई (ख्रिश्चन) लोकांत ज्या वाईट समजुती व कुप्रथा पसरल्या होत्या त्यांचे वर्णन केल्यावर मिस्टर वास्वर्थ स्मिथ यांनी आपल्या पुस्तक 'मुहम्मद अँड मुहम्मदइज्म' मध्ये लिहिले आहे -

''पैगंबर मुहम्मद (स.) अशासाठी आले की त्या सर्व खोट्या गोष्टी त्यांनी पुसून टाकाव्यात. मूर्ती काय आहे? निव्वळ जैतूनच्या (ऑलिव्हच्या) लाकडाचे तुकडे, जे ईश्वर असल्याचा दावा करतात, त्यांची वास्तविकता काय आहे? भ्रमजनक दार्शनिक विचार जणू कोळ्याने विणलेले जाळे व अधर्म, हे सर्व दूर करावे. अल्लाह सर्वात महान आहे आणि त्याच्याशिवाय कोणीही महान नाही. हाच आहे मुस्लिमांचा धर्म इस्लाम म्हणजे माणसाने अल्लाहच्या मर्जीवर विश्वास ठेवावा आणि असे करण्यात अत्यंत प्रसन्नता प्राप्त करावी. हीच मुस्लिमांची जीवनप्रणाली होय. एक टीकाकार असा प्रश्न करू शकतो की या दोन्ही सिद्धान्तामध्ये ज्यांचा उल्लेख वर केला आहे त्यात अशी कोणती गोष्ट आहे जिला असे म्हणावे की ती नवीन होती किंवा केवळ पैगंबर मुहम्मद (स.) यांनाच सुचली होती? नि:संशय कोणतीही नवीन गोष्ट नव्हती तर या गोष्टी तितक्याच पुरातन होत्या जितका पुरातन आदरणीय मूसा (अ.) यांचा काळ, इतकेच नव्हे तर या गोष्टी तितक्याच प्राचीन होत्या जितके खुद्द आदरणीय इब्राहीम (अ.) होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी वारंवार अत्यंत गंभीरपणे सांगितले आहे की मी अरबांसाठी एखादी नवीन गोष्ट घेऊन आलेलो नाही, तर आदरणीय इब्राहीम (अ.) यांच्या धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आलेलो आहे. हा धर्म सदैव येथे नांदत राहिला आहे. परंतु लोकांना याचा विसर पडलेला आहे अथवा याच्यापासून गाफील झालेले आहेत. जातीपासून वेगळे व शोकग्रस्त आणि अप्रसन्न. यहूदी लोक आपसात भांडणाऱ्या तीन ईश्वरांना मानणाऱ्या इसाई (ख्रिश्चन) आणि सर्व प्रकारच्या प्राणीपूजकांत एक उंट हांकणारा आला, अशसाठी नव्हे की त्याने त्यांना एखादी नवी गोष्ट शिकवावी तर ज्या जुन्या गोष्टी ते विसरून गेले आहेत, त्यांची आठवण त्यांना करून द्यावी. अरबस्थानच्या भूमीवर दोन हजार वर्षांपूर्वी एक अशा व्यक्तीला (आदरणीय मूसा (अ.)) जो जंगलात आपल्या वडिलांच्या (सासऱ्याच्या) शेळ्या चारीत होता, त्याला हा साधा परंतु चकित करणारा संदेश आला होता - 'मी तो आहे जो मी आहे. ऐक, हे इस्राईल! आमचा स्वामी अल्लाह एक आहे. म्हणून जा! मी तुझ्या जिभेबरोबर असेन आणि तुला जे सांगावयास पाहिजे, ते तुला मी शिकवीन.''

हे शब्द ऐकूनही सन्मानप्राप्त जात (बनीइस्राईल) आफ्रिका सोडून आशियात गेली. गुलाम मुक्त झाले आणि एक वंश एक जात बनले. त्याच अरबस्थानच्या भूमीवर आता पुन्हा तो आवाज एका अन्य शेळ्या चारणाऱ्याला आला जो पहिल्या आवाजापेक्षा काही कमी विचित्र अथवा सामान्यपणे जगाला लाभ पोचविण्याच्या दृष्टीने त्यापेक्षा काही कमी नव्हता, म्हणजे ''अल्लाहु अकबर, ला इलाहा इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलुल्लाह' हा संदेश देणाऱ्याचा स्वीकार केला व अल्लाहच्या संदेशाची घोषणा केली गेली आणि एका शतकात त्याचा आवा एडनपासून अन्ताकिया (आशियाई रोमन साम्राज्याचे केंद्र) पर्यंत व सेबील (स्पेनचा एक प्रांत व शहर) ते सरकंदपर्यंत पसरला आणि त्या सर्व देशांत त्याची सत्यता मान्य केली गेली. -एजाजुत्तंजील, पृ. २८-२९

खरा संदेशवाहक

मिस्टर कारलायल लिहितात -

''पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या बाबतीत कदापि असा विचार करू शकत नाही ते केवळ एक लबाड व आत्महीन व्यक्ती होते आणि आम्ही त्यांच्यासंबंधी असेही सांगू शकत नाही की ते एक नीच, अधिकारलोभी व हेतूपुरस्सर उद्देश गाठणारे होते, त्यांनी जगाला जो कठोर संदेश दिलेला आहे तो पूर्णपणे एक सत्य व वास्तविक संदेश होता आणि जरी ते एक क्रमहीन कथन होता तरीसुद्धा त्याचा उगम तेच व्यक्तित्व (ईश्वर) होते, ज्याचा ठाव कोणासही मिळाला नाही. त्या व्यक्तीचे (पैगंबर मुहम्मद (स.)) कथन व कार्यही असत्य नव्हते आणि ते सत्यापासून रिक्त व कोणाची नक्कल व अनुसरणही नव्हते. वास्तविकत: ते अविनाशी जीवनाचे एक दैदिप्यमान व्यक्तित्व होते जे निसर्गाच्या विस्तृत वक्षस्थलावरून जगाला प्रकाशित करण्यासाठी निघाले होते आणि नि:संदेह त्याच्याकरिता ईश्वराला असाच आदेश होता.''

- एजाजुत्तंजील, पृ. ५९, बहवाला 'हीरोज अँड हीरो वर्शिप',

द्वितीय व्याख्यान, पृ. ४३

अल्लाहच्या विचाराने सदैव ओतप्रोत राहणारे

कट्टर ख्रिश्चन डॉ. स्पिरिंगर लिहितो -

"तो ज्याच्या विचारात सदैव अल्लाहचीच कल्पना असे आणि ज्याला उगवता सूर्य, पावसाचा होणारा वर्षाव व उगवणाऱ्या हिरवळीत अल्लाहचाच हात दिसत असे आणि मेघ-गर्जना, पाण्याचा आवाज, अल्लाहच्या प्रशंसेत गायिले जाणारे चिमण्यांच्या गीतात ईश्वराचीच वाणी एकू येत असे आणि भयाण अरण्ये व प्राचीन शहरांच्या ख्रिश्चन अल्लाहच्याच प्रकोपाचे चिन्ह दिसत असत."

- एजाजुत्तंजील, पृ. ३०, बहवाला 'लाइफ ऑफ मुहम्मद' पृ. ८२,
लेखक डॉ. स्पिरिंगर द्वारा लिखित व १८५१ मध्ये अलाहाबादहून प्रकाशित

महानतम व्यक्ती

पवित्र कुरआनचे अनुवादक रेव्हरंट जी. एम. रॉडवेल लिहितात -

"हा अद्भूत व आश्चर्यजनक नमुना आहे त्या शक्ती व आत्म्याचा जो अशा व्यक्तींमध्ये आढळतो जिला अल्लाह व परलोकावर दृढ विश्वास असतो व ज्यांची आपल्या महान व्यक्तित्व व सत्यतापूर्ण आचरणामुळे सदैव त्या लोकात गणना केली जाईल ज्यांना मानवजातीचा विश्वास, आचरण व संपूर्ण सांसारिक जीवनावर असा पूर्ण अधिकार प्राप्त होतो जो एखाद्या अत्यंत महान कोटीच्या व्यक्तीशिवाय अन्य कोणाला प्राप्त झाला नाही व होऊ शकतही नाही."

- एजाजुत्तंजील, पृ.३०, बहवाला, भूमिका, अनुवाद कुरआन
लिखित रॉडवेल, पृ. २३, मुद्रित १८६१

स्त्री-उद्धारक

मिसेस ॲनी बेझंट आपल्या व्याख्यानात म्हणतात -

"आपण आपल्या पैगंबरांचा थोडा विचार करा आणि या स्थितीची कल्पना करा जेव्हा केवळ त्यांच्या पत्नीनेच त्यांच्यावर ईमान आणलेला आहे. यानंतर अत्यंत निकटमसंबंधी त्यांच्यावर ईमान आणतात, या गोष्टीवरूनदेखील पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विषयी काही न काही माहिती उपलब्ध होते. एका अशा समूहातून अनुयायी प्राप्त करणे सोपे आहे ज्याला आपल्याविषयी माहिती नाही, जो आपल्याला केवळ

स्टेजवरच पाहतो, जो आपले तयार असलेले भाषणच ऐकतो किंवा जो आपल्याला काही प्रश्नांची उत्तरे देत असताना पाहतो. परंतु आपली पत्नी, आपली कन्या व आपला जावई व अन्य निकटवर्ती संबंधियांच्या नजरेत पैगंबर बनणे खरोखर पैगंबर बनणे होय व हा एक असा विजय आहे, जो आदरणीय इसा (अ.) (येशू ख्रिस्त) यांनादेखील लाभला नाही.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या चरित्राचे वर्णन करताना मिसेस ॲनी बेझंट म्हणतात-

''नि:संशय हे एका भद्रपुरुषाचे जीवन होय, एक अद्‌भूत व विचित्र जीवन आहे. खरोखर ते ईशदूत होते, परंतु असे असूनदेखील ते इतके काटकसरी, साधे व नम्र आहेत की आपल्या फाटक्या वस्त्रांना स्वत:च ठिगळ लावतात आणि आपल्या बुटांची स्वत:च दुरुस्ती करताना आढळतात. विशेषत: अशा परिस्थितीत की जेव्हा लक्षावधी लोक त्यांना पैगंबर मानत असत व विनम्रता दर्शवीत असत तेव्हा ते आपल्या सभोवतालच्या लोकांशी अत्यंत प्रेमपूर्वक व नम्रतापूर्ण व्यवहार करीत असत. माननीय अनस (रजि.) जे त्यांचे सेवक होते, ते म्हणतात की मी त्यांच्या सेवेत दहा वर्षे राहिलो या काळात त्यांनी माझ्यासाठी 'ब्र'देखील काढला नाही.''

''त्यांचे टीकाकार त्यांच्यावर दोन आरोप करतात. एक असा की त्यांनी वृद्धापकाळात नऊ विवाह केले. हे सत्य आहे, परंतु काय आपण मला असे म्हणून इच्छिता की ज्या माणसाने चोवीस वर्षांचे वय असता ऐन तारुण्यात एका अशा स्त्रीशी विवाह केला की जी वयाने कितीतरी मोठी होती तिच्याशी सव्वीस वर्षांपर्यंत एक विश्वासपात्र पति म्हणून संसार केला, त्याने पन्नास वर्षांच्या वयात की जेव्हा कामवासना लयाला जाते तेव्हा त्याने कामवासनेच्या व इच्छांच्या आवेगाने विवाह केले? मानवी जीवनाची या मान-दण्डावर पारख केली जाऊ शकत नाही. जर आपण त्या स्त्रियांच्या स्थितीचा विचार केला की ज्यांच्याशी त्यांनी विवाह केला तर आपल्याला कळेल की त्या प्रत्येकीद्वारे एकतर मुस्लिमांसाठी समझोता केला गेला होता किंवा त्यांच्यासाठी कही प्राप्त केले गेले होते अथवा त्या स्त्रीच्या संरक्षणाची निकड होती. लोक असेही म्हणतात की त्यांनी युद्ध करण्याचा व काफिरांना ठार करण्याचा उपदेश दिला होता. यासंबंधी मुस्लिम फकीहनी (धर्मशास्त्र पंडित) निर्णय दिला आहे की जेव्हा दोन आज्ञा असतील आणि त्यापैकी एक विनाअट असेल जसे 'काफिराला (नास्तिकाला) ठार करा' व दुसरी अटीसह जशी 'जर काफिराने आक्रमण केले अथवा तुमच्या धर्मात

अडथळा आणला तर त्याला ठार करा.' तर अशा प्रत्येक विनाअट आज्ञेवर त्या बंधन अथवा सीमेला वाढविणे आवश्यक आहे आणि त्या सिद्धान्ताची अनेक उदाहरणे पवित्र कुरआनात आढळतात. पैगंबर मुहम्मद (स.) यांची कार्यप्रणालीसुद्धा त्यानुसार होती.''

आता आपण पैगंबर मुहम्मद (स.) यांची कार्यप्रणाली पाहू या की त्यांनी दुसऱ्यांना जी शिकवण दिली, त्यानुसार त्यांनी स्वत: व्यवहार केला किंवा नाही? आपल्याशी केलेला असा कोणताही दुर्व्यवहार नव्हता की ज्याबद्दल त्यांनी क्षमा केली नाही.

''माझ्या बंधुनो! या व्यक्तीला त्या दृष्टीने पाहा जसा ती वास्तविकत: आहे. द्वेषाच्या पडद्यातून त्याला पाहण्याचा प्रयत्न करू नका.''

- मासिक 'निजामुल मुशायरत' दिल्ली, जमादुलऊला, १३३४ हिजरी

मानवतेचा मुक्तिदाता

इंग्लंडचे विश्वविख्यात दार्शनिक व विद्वान 'मिस्टर बर्नार्ड शॉ' यांनी जानेवारी १९३३ इ. मध्ये भारतात आले असता 'लाईट' च्या प्रतिनिधीजवळ इस्लामच्या पैगंबरासंबंधी खालीलप्रमाणे विचार प्रकट केले होते -

''मी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाचा अभ्यास केला आहे. ते एक महामहिम मानव होते. माझ्या मते त्यांना मानवतेचा मुक्तिदाता म्हणणे इष्ट ठरेल. मला विश्वसा आहे की जर त्यांच्या समान एखादा मनुष्य वर्तमान जगाचा अधिनायक बनला असता तर त्याच्या सर्व जटिल समस्यांचे त्याने अशाप्रकारे समाधान केले असते की मानवी जग त्याच्या इच्छित सुख व शांतीच्या संपत्तीने केव्हाच संपन्न झाले असते.''

ठेवींचा रक्षक

ग्रेट टीचर हरबर्ट वायल लिहितात -

पैगंबर मुहम्मद (स.) यांना जवळपास राहणारे लोक 'अमीन' (ठेवरक्षक) म्हणून बोलवीत असत. संकटात सापडलेले गरीब लोक त्यांच्याजवळ सल्ला मागण्यास येत असत. कारण त्यांना त्यांच्या खरेपणावर विश्वास होता. पैगंबर मुहम्मद (स.) बहुतेक एका निर्जन स्थळी गुहेत ईश्वराच्या उपासनेत मग्न असत. एका रात्री जेव्हा ते जमिनीवर पहुडले होते तेव्हा आकाशातून एक प्रकाश प्रकट झाला आणि

एका तेजस्वी रूपावर त्यांची दृष्टी पडली. त्याने सांगितले, "उठ! तू अल्लाहचा पैगंबर आहेस. आपल्या पालनकर्त्यांचे नाव घेऊन पठण कर." पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विचारले "मी काय पठण करू?" यानंतर त्या दैवी आत्म्याने काही उपदेश दिला. ही ती अद्भूत व विचित्र घटना होती जिने पैगंबर (स.) यांचे जीवन पूर्णपणे बदलून टाकले. यापूर्वी ते केवळ 'अमीन' होते, परंतु आता ते रसूल (पैगंबर) बनले. त्यांनी लोकांना जो सर्वप्रथम उपदेश दिला त्यात अल्लाह एक असल्याचे वर्णन होते आणि मानव-हत्या, मद्यपान व प्रत्येक कुकर्माची निंदा केली गेली होती. बऱ्याचशा लोकांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला. खरे पाहता हा अंदाज लावणे कठीण आहे की पैगंबर (स.) यांच्यात लोकांच्या हृदयांना मोहित करण्याचे किती मोठे सामर्थ्य होते?

अत्यंत क्षमाशील विजेता

'स्पीचेस ऑफ मुहम्मद' मध्ये प्रसिद्ध इतिहासकार लीनपोल लिहितो -

'पैगंबर (स.) यांचे व्यक्तित्व दया व शौर्य या दोन्ही गुणांचे संमिश्रण आहे. ते अनेक वर्षे एकटेच आपल्या देशवासियांच्या शत्रुत्वाचा सामना करीत राहिले. पैगंबर (स.) इतके सुशील होते की ते प्रत्येकाला प्रसन्न मुखाने भेटत असत. त्यांची निष्कपट मैत्री, सहानुभूति, हृदयाची उदारता, वीरता व शौर्य प्रशंसनीय आहे. जेव्हा ते दहा हजार लोकांसमवेत मक्का शहरात विजेता म्हणून दाखल झाले तेव्हा खरे पाहता पैगंबर (स.) यांना क्रूरता दाखविण्याची व सर्व दुष्टपणाचा सूड उगविण्याची सुवर्ण संधी आली होती, कारण त्यांना त्रास देणारे व दु:ख पोहचविणारे त्यांच्या ताब्यात होते आणि बदला घेणे सहज शक्य होते, परंतु त्यांनी कुरैश लोकांना सर्व अपराधाबद्दल क्षमा केली आणि त्यांच्या सैन्याने अत्यंत शांतीपूर्वक शहरात प्रवेश केला. कोणतेही घर लुटले गेले नाही. कोणतीही स्त्री अपमानित झाली नाही की कसलाही रक्तपात झाला नाही. देशविजयाच्या इतिहासात अशा प्रकारच्या विजय-प्रवेशाचे कोणतेही उदाहरण आढळत नाही."

अत्यंत नम्र स्वभावाचे सुधारक

डब्ल्यू इर्विंग लिहितात -

"पैगंबर (स.) अत्यंत नम्र स्वभावाचे सुधारक होते. त्यांचे बौद्धिक गुण असामान्य व कल्याण-शक्ती उत्तम कोटीची होती. ते अत्यंत तीव्र बुद्धीचे व संयमशील आणि सदाचारी होते. ते आप्तेष्ट, परके, श्रीमंत व गरीब, बलवान व

निर्बल, युवक आणि वृद्ध सर्वांशी एकसमान न्यायपूर्ण व्यवहार करीत, सामान्य लोकांना मोठ्या प्रेमाने व सहानुभूतीने भेटत असत. अशा प्रकारच्या स्थायी संयमी व सदाचारी सुधारकावर दोषारोपण करणे म्हणजे एक भ्रष्टतापूर्ण चूक आहे.''

ईशचमत्कारसंपन्न व्यक्ती

प्रसिद्ध फ्रेंच विद्वान डॉक्टर गेस्टोव लीबान आपल्या 'इस्लामची संस्कृती' या पुस्तकात लिहितात -

''पैगंबर (स.) अत्यंत गंभीर, अल्पभाषी व दृढ संकल्पी होते. ते जितके प्रयत्नशील होते. तितकेच सहनशील व धैर्यवानदेखील होते. त्यांचे विचार अत्यंत शुद्ध होते. त्यांनी चंद्राचे तुकडे केले, अस्त पावलेल्या सूर्यास पुन्हा उगविले आणि हे सर्व ईशचमत्कार म्हणून होते. माझ्या मते पैगंबर (स.) यांना जादुगार म्हणणे मूर्खपणा होय.''

सर्वाधिक प्रामाणिक व खरे जीवनचरित्र

'ॲपॉलॉजी फॉर मुहम्मद ॲन्ड कुरआन'चा रचयिता जॉन डेव्हिड पोर्ट लिहितो -

''पैगंबर मुहम्मद (स.) च्या सत्यता व शुद्ध हृदयाचा प्रबळ पुरावा असा आहे की सर्वात प्रथम ज्या लोकांनी त्यांच्यावर ईमान आणले (म्हणजे मुस्लिम झाले) ते त्यांच्या घरातील लोक व निकट संबंधी आहेत ते ज्यांच्या घरगुती जीवनाशी पूर्णपणे परिचित होते. तर त्यांच्यात खरेपणा नसता तर त्यांनी हरकत अवश्य घेतली असती आणि विरोधाचे वादळ उठविले असते. यात कसलीही शंका नाही की सर्व लेखक व विजेत्या शूरामध्ये एकदेखील असा नाही की ज्याचे जीवनचरित्र त्यांच्यापेक्षा विस्तृत व खरे असावे.''

त्यांचे व्यक्तित्व म्हणजे सुख व कल्याणाचे स्रोत

'यार्क्स डाड' याने आपल्या 'मुहम्मद, बुद्ध ॲन्ड मसीह (येशू ख्रिस्त)' या पुस्तकात लिहिले आहे -

''पैगंबर (स.) यांचे चरित्र अत्यंत उत्तम होते. त्यांच्या दृष्टीने ऐहिक जीवनाला काडीचीसुद्धा किंमत नव्हती. त्यांच्या सेवेत प्रत्येक व्यक्तीला स्थान मिळू शकत होते. आम्ही अत्यंत सत्यतापूर्वक म्हणू इच्छितो की, त्यांचे व्यक्तित्व सुख व कल्याणाचे स्रोत होते. ते अद्वितीय सुशील व फार सहृदय व्यक्ती होते. त्यांचे सहनशील व संयमी जीवन मनाला मोहित करणारे आहे आणि आमच्या मनात त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाबद्दल विशेष श्रद्धा आहे.''

समस्त मानवजातीचा मार्गदर्शक

लाला काशीराम चावला 'ऐ मुस्लिम भाई'मध्ये लिहितात-

''पैगंबर (स.) यांच्या जीवनचरित्राचा जसजसा अभ्यास करतो तसतसा जेथे एक निराळाच मोठेपणा व वैभव आढळतो तेथे एका विशेष प्रकारच्या सुखाचा अनुभव येतो. कोणास माहीत होते की हा उम्मी (निरक्षर) व अशिक्षित बालक एकेदिवशी मोठमोठ्या विद्वान व ज्ञानविशारदांची वाक्‌शक्ती हिरावून घेईल आणि कोण म्हणू शकत होता की या अनाथाचे नाव घेणारे कधी काळी पृथ्वीतलावर चाळीस कोटींपेक्षा अधिक होतील.'' (आता तर ही संख्या एक अब्जपेक्षा जास्त आहे.)

सर्व धर्माचे प्रणेते व संस्थापक मोठमोठ्या कुळात जन्मले होते व त्यांच्या जन्मावर फार जल्लोष केला गेला होता, खूप हर्ष झाल्यामुळे वाद्ये वाजविली गेली. उदाहरणार्थ- आदरणीय इसा (अ.) बुद्ध भगवान, आदरणीय मूसा (अ.), भगवान कृष्ण, भगवान महावीर, गुरु नानक या सर्वांचे बालपण मोठ्या प्रेमात व वैभवात व्यतीत झाले. परंतु पैगंबर (स.) यांच्या कष्टांचा प्रारंभ त्यांच्या जन्मापूर्वीच झाला होता.

ते अद्याप आईच्या उदरातच होते तेव्हा त्यांच्या वडिलांचे निधन झाले. सहा वर्षाचे वय असता मातृ-प्रेमाची छायादेखील नाहीशी झाली. दोन वर्षे आजोबांच्या मांडीवर खेळले व आठव्या वर्षी तेदेखील स्वर्गवासी झाले, आणि मग त्यांच्या चुलत्याने त्यांचे संगोपन केले. अशाप्रकारे बालपणात शिक्षण-दीक्षा व सुख-शांतीचे सर्व साधने लुप्त झाली. काय हा ईशचमत्कार नाही की अशा दशेत वाढलेला मनुष्य आज मानवजातीच्या एका विशाल समूहाचा मार्गदर्शक व नेता म्हणून स्वीकारला जात आहे आणि त्याने अरबस्थानसारख्या रानटी देशातून निराश्रित असतानादेखील जगातील लोकांना मानवतेचा शुभसंदेश दिला.

कोणाला कल्पना होती की अशा अप्रसिद्ध कुटुंबात जन्म घेणारा अशिक्षित व अनाथ बालक अरबस्थानातून अज्ञानाचे उच्चाटन करणारा सुधारक बनेल? संपूर्ण जगात इस्लामी पताका उंचावणारा पैगंबर बनेल? पवित्र कुरआनचा संदेश पोचविणारा पैगंबर बनेल? अडाणी लोकांत महत्त्वपूर्ण क्रांती निर्माण करणारा सुधारक बनेल? आणि एका अगदी निराळ्या व नवीन धर्माचा प्रकाश दाखवील? अत्यंत अल्प काळात स्वत: अशिक्षित असूनदेखील आपल्या बौद्धिक ज्ञानाने संपूर्ण जगाच्या एका मोठ्या भागाला शिक्षण व ज्ञानाने परिपूर्ण करील? व तेही अशा ज्ञानाने जे विश्वाच्या समस्त लोकांसाठी

एक अनुकरणीय आदर्श आहे.

पैगंबर (स.) यांनी उदारता व समता, सत्य आणि न्याय व शेजाऱ्यांच्या स्वत्वाचा जो उच्च आदर्श जगात स्थापित केला आहे तो पाहून आश्चर्यचकित व्हावे लागते. त्यांचा सद्‌व्यवहार व साम्यभाव असा होता की त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात कधीही आपल्या एखाद्या गुलामाला किंवा बालकाला अथवा जनावरालासुद्धा मारले नाही आणि कोणासाठी अपशब्द काढला नाही. एकदा त्यांनी पाहिले की मांजर तहानलेले आहे तेव्हा त्यांनी वुजू (हात, पाय व तोंड धुण्याची क्रिया) करीत असलेल्या तांब्याने पाणी पाजले. अशाच प्रकारे एकदा मांजर त्यांच्या अंथरुणावर निद्रा-सुख घेत होते तेव्हा त्यांनी मांजराला निद्रा-सुखापासून वंचित केले नाही. चिमण्या व मुग्यांना मारणाऱ्याविरूद्ध आदेश दिला, कुत्र्याला पाणी पाजणाऱ्यांचे अपराध माफ केले. युद्ध-कैद्यांचा सन्मान केला. अत्यंत महत्त्वपूर्ण युद्ध-नियम तयार केले, ज्यात स्त्री, बालक, वृद्ध, झोपलेल्या व नि:शस्त्र माणसावर हत्यार चालविण्यास मनाई केली. पीक व फळांना नुकसान पोचविण्यास प्रतिबंध केला.

पैगंबर (स.) दुसऱ्या जातींच्या सरदारांचा आदर-सत्कार करीत असत. अन्य धर्मांच्या विद्वान व प्रतिष्ठीत मंडळींना सन्मानपूर्वक भेटत असत. जेथे आपल्या प्रिय अनुयायांसाठी रात्रंदिवस ईश्वराजवळ प्रार्थना करीत तेथे विरोधक व शत्रूंसाठीसुद्धा प्रार्थना करीत असत. जेव्हा 'उहुद'च्या युद्धात त्यांच्या तोंडावर दगडांचा वर्षाव केला गेला व त्यांचे दात पडले तेव्हा त्यांनी प्रार्थना केली. 'हे माझ्या अल्लाह! तू माझ्या जातीच्या या लोकांना क्षमा प्रदान कर कारण नि:संशय त्यांना माहीत नाही (की ते काय करीत आहेत).''

त्यांचे दातृत्व व हृदयाचे औदार्य अद्वितीय होते. याचक कोणत्याही धर्माचा किंवा संप्रदायाचा का असेना, तो त्यांच्या दारावरून निराश परतणे शक्य नव्हते. त्यांचा असा आदेश होता की सृष्टीतील प्राण्यावर दया करा आणि अल्लाहचे भय बाळगा. ते कर्ज घेऊनदेखील लोकांच्या गरजा भागवीत असत. त्यांची आज्ञा होती की शत्रूच्या प्रेताला नष्ट केले जाऊ नये, स्त्रिया व बालकांची हत्या केली जाऊ नये, शरीराचे अवयव कापून-कापून वध केला जाऊ नये व शरीराच्या कोणत्याही अवयवाला जाळू नये.

त्यांच्या सत्यप्रियता, शुद्धहृदयता, प्रामाणिकपणा व न्यायप्रियतेची प्रशंसा केवळ मुस्लिमांनीच नव्हे तर अबू जहल व अबू सुफयानसारख्या रक्त पिण्यास आसुसलेल्या शत्रूंनीदेखील केली आणि माणसाची प्रशंसा तीच होय जी विरोधकांनी

करावी व खरा दोष तोच होय जो मित्रांनी निस्संकोच दाखवावा.

काय हा पैगंबर (स.) यांचा चमत्कार नव्हे की अरबस्थानातील अडाणी, अभिमानी, युद्धपिपासु, भांडखोर, अंधविश्वासू, जुगारी, दारुडे, डाकू, व्यभिचारी, प्रतिज्ञाभंग करणारे, कन्यांना ठार करणारे, सावत्र आईशी विवाह करणारे लोक आज सरळ स्वभावी, प्रवाशी व पाहुण्यांचा आदर-सत्कार करणारे, परिश्रमी, प्रामाणिक, सहाय्यक, आज्ञापालक, समतावादी व अल्लाहचे उपासक दिसत आहेत? हा त्यांच्या शिकवणींचा अलौकिक चमत्कार आहे की त्यांनी इतक्या अल्प काळात या लोकांचे आचार-व्यवहार व स्वभावात असामान्य आमूलाग्र क्रांती घडवून आणली आहे.

पैगंबर (स.) यांनी त्यांचा इतका प्रभाव व अधिकार असूनदेखील आपल्या स्वभावात कधीही परिवर्तन येऊ दिले नाही. एका प्रवासात भोजन तयार नव्हते. त्यांच्या सोबत्यांनी मिळून जेवण तयार करण्याचे ठरविले. सर्वांनी एक एक काम वाटून घेतले. सोबत्यांनी विरोध केला असतानादेखील पैगंबरांनी जंगलातून लाकडे (जळण) आणण्याचे काम स्वत:वर घेतले आणि म्हणाले, ''काही कारण नाही की मी स्वत:ला श्रेष्ठ समजावे.''

बदरच्या युद्धात स्वारींची (घोडे, उंट वगैरे) संख्या कमी होती. आळीपाळीने लोक स्वार होत असत. पैगंबर (स.)सुद्धा अशाप्रकारे आपली पाळी आल्यावर स्वार होत व पायी चालत.

त्यांचे साधे जीवन एक आदर्श उदाहरण बनले आहे. याचा उल्लेख अगोदरच येऊन गेला आहे की ते आपल्या घरातील कामे स्वत:च्या हाताने करीत असत. कपड्यांना ठिगळ लावणे, फाटके जोडे दुरुस्त करणे, केरसुणीने झाडणे, जनावरांची धार काढणे, बाजारातून सौदा आणणे वगैरे सर्व कामे त्यांचा दिनचर्येचे भाग होते. देखावा व ढोंगीपणा ते अजिबात पसंत करीत नसत. आपल्या केसांत ते दोन दिवसाने फणी फिरवीत असत. जाड व फाटके कपडे ते नेसत असत. कुडत्याची गुडी उघडी असे. शृंगार करणे त्यांना पसंत नसे. एकदा पैगंबर (स.) आपल्या प्रिय सुकन्या माननीय फातिमा जुहरा (रजि.) यांच्या घरी गेले. परंतु भिंतीवर लोंबकळलेले पडदे पाहून परत फिरले. कारण विचारल्यावर ते म्हणाले, ''ज्या घरातील लोकांचे मन सजावटीत गुंतलेले असेल तेथे मी जाऊ शकत नाही. त्याला कारण असे होते की त्यांच्यापाशी ईशआदेश पोचला होता की अल्लाहच्या प्रेमापुढे जगाचे प्रेम तुच्छ आहे.

पवित्र कुरआनमध्ये एके ठिकाणी म्हटले आहे -

''हे अल्लाहवर विश्वास ठेवणाऱ्यांनो! तुम्हाला तुमच्या (जगातील) धन व संततीने ईश्वराच्या उपासनेपासून गाफील करू नये आणि जो असे करील तो हानी सहन करणाऱ्यांपैकी होय.''

ते संपूर्ण रात्र ईश्वराच्या उपासनेत मग्न राहत असत. जेव्हा घरातील लोक रात्री झोपत तेव्हा ते अंथरुणातून उठून अल्लाहच्या स्मरणात मग्न होत. त्यांच्या सुपत्नी माननीय आएशा सिद्दीका (रजि.) म्हणतात की एके रात्री मी झोपेतून जागी झाले तेव्हा ते अंथरुणावर नसल्याचे आढळले. मला वाटले की ते एखाद्या अन्य पत्नीच्या खोलीत गेले असावेत, परंतु अंधारात शोध घेतला तेव्हा कळले की त्यांचे पवित्र मस्तक जमिनीवर टेकलेले आहे आणि ते अल्लाहच्या प्रार्थनेत मग्न आहेत. ते पाहून त्या खूप लज्जित झाल्या की त्यांचा समज कसा चुकीचा होता आणि ते कोणत्या दशेत आहेत? याचेच नाव इस्लाम आहे. इस्लामचा अर्थ आहे अल्लाहपुढे नतमस्तक होणे. पैगंबर (स.) जणू सदैव अल्लाहसमोर उपस्थित राहत. त्यांनी युद्धाच्या मैदानावरदेखील कधी नमाज सोडली नाही.

अल्लाहवर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यांचे म्हणणे आहे की जरी बुटाची लेस तुटली तरी ती अल्लाहजवळ मागा. एकदा त्यांच्या सुकन्या माननीय फातिमा (रजि.) घरातील काम जास्त असल्यामुळे त्यांच्या सेवेत उपस्थित झाल्या आणि फार भीत-भीत एका सेवकाची मागणी केली. तेव्हा ते म्हणाले- ''हे प्रिय कन्ये! तू अल्लाहवर विश्वास ठेव आणि त्याचा हक्क अदा कर. आपल्या घरातील लोकांची सेवा स्वत: कर. जर एखादे वेळी तुला थकवा वाटला तर 'सुबहानल्लाह' (अल्लाह पवित्र आहे) ३३ वेळा, 'अलहम्दुलिल्लाह' (सर्व प्रशंसा अल्लाहसाठीच आहे) ३३ वेळा व 'अल्लाहु अकबर' (अल्लाहच सर्वात महान आहे) ३४ वेळा पठण कर. तुझा सर्व थकवा दूर होईन.'' याला म्हणतात खरी भक्ती! याचे नाव आहे अल्लाहची खरी उपासना! याचे नाव अल्लाहचे प्रेम!

ते म्हणत असत, ''मुस्लिमांची सर्वप्रथम निशाणी अशी आहे की त्याने अल्लाह व कियामत (अंतिम दिन) च्या हिशेबाची भीती बाळगावी.''

- 'ऐ मुस्लिम भाई' (पृष्ठ २५२ ते १५८)

पैगंबर (स.) यांच्याविषयी विश्वमान्य महात्मा गांधीचे विचार असे आहेत -

''इस्लाम आपल्या अत्यंत विशाल युगातदेखील अनुदार नव्हता तर संपूर्ण जग त्याची प्रशंसा करीत होता. त्यावेळी की जेव्हा पश्चिमात्य जग अंध:कारात बुडलेले होते तेव्हा पूर्व क्षितिजाकडून एक उज्ज्वल तारा चमकला व त्याने त्रस्त जगाला प्रकाश व शांति प्रदान केली. इस्लाम खोटा धर्म नव्हे. हिंदुनादेखील याचा अभ्यास त्याचप्रमाणे केला पाहिजे जसा मी केला आहे. मग ते माझ्याप्रमाणेच त्याच्यावर प्रेम करू लागतील.

मी इस्लामच्या पैगंबरांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करीत होतो. जेव्हा मी पुस्तकाचा दुसरा भागदेखील वाचून संपविला तेव्हा मला दु:ख झाले की या महान प्रतिभाशाली जीवनाचा अभ्यास करण्यासाठी आता माझ्याजवळ अन्य कोणतेही पुस्तक उरले नव्हते. आता माझा विश्वास पूर्वीपेक्षाही अधिक दृढ झाला आहे की ही शक्ती तलवारीची नव्हती की जिने इस्लामसाठी विश्वक्षेत्रात विजय मिळविला तर ही शक्ती इस्लामच्या पैगंबराच्या अत्यंत साधे जीवन, त्यांच्या नि:स्वार्थपणा, प्रतिज्ञा-पालन व निर्भयपणाची होती, त्यांचे आपले मित्र व अनुयायींवर प्रेम व ईश्वरावर विश्वास होता. ही शक्ती तलवारीची नव्हती तर ही सर्व वैशिष्ट्ये व गुण होते ज्याच्यामुळे सर्व अडथळे दूर झाले व सर्व अडचणींवर इस्लामने विजय मिळविला.

मला कुणीतरी सांगितले होते की दक्षिण आफ्रिकेत जी युरोपियन लोकांची वस्ती आहे तिचा इस्लामच्या प्रचारापुढे थरकांप उडाला आहे. त्याच इस्लाममुळे की ज्याने मोरोक्कोत प्रकाश पसरविला व जगातील मानवजातीला भाऊ-भाऊ बनण्याचा शुभ-संदेश दिला, नि:संदेह दक्षिण आफ्रिकेच्या युरोपियन लोकांना इस्लामचे भय नाही तर वास्तविकत: त्यांना या गोष्टीचे भय आहे की जर आफ्रिकेच्या आदिवासींनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला तर ते गोऱ्या जातीच्या लोकांच्या बरोबरीने हक्क मागू लागतील. जर भाऊ-भाऊ बनणे पाप आहे तर आपण त्यांना खुशाल भिऊ द्या. जर त्यांना या गोष्टीची चिंता असेल की त्यांचे वांशिक श्रेष्ठत्व कायम टिकून राहू शकणार नाही तर त्यांची भीती योग्यच आहे, कारण मी पाहिलेले आहे की जर एखादा झुलो आदिवासी जेव्हा ख्रिश्चन धर्म स्वीकारतो तेव्हा तो गोऱ्या रंगाच्या ख्रिश्चनांच्या बरोबरीचा होऊ शकत नाही. परंतु याउलट ज्या क्षणी तो इस्लाम धर्माचा स्वीकार करतो त्या क्षणीच तो त्याच पेल्यात पाणी पितो आणि त्याच थाळीत जेवण जेवतो ज्यात एखादा अन्य मुसलमान पाणी पितो अथवा जेवण करतो, तर वास्तविक गोष्ट ही आहे जिच्या भीतीमुळे युरोपियन लोकांचा थरकांप उडाला आहे.'' - जगत महर्षि : पृष्ठ २

'स्वामी भवानी दयाळ संन्यासी' दक्षिण आफ्रिकेचे सुप्रसिद्ध भारतीय पुढारी व

नेटाल इंडियन नॅशनलचे माजी उपाध्यक्ष आहेत. भारतीय पत्रकांतसुद्धा त्यांचे उच्च विचार प्रकाशित होत असतात. एकदा पैगंबर जयंतीप्रसंगी डेहरी (शाहाबाद) येथे आयोजित एका विराट सभेच्या अध्यक्षपदावरून त्यांनी ते भाषण केले त्यातील काही अंश खाली दिले आहेत -

"आज पैगंबर (स.) यांच्या अनुयायींची संख्या फार मोठी आहे. परंतु आपणांस असे वाटते का की त्यांच्या जातीने त्यांची सत्यतापूर्ण पुकार ताबडतोब ऐकली? आणि त्यांचे आदेश ताबडतोब मान्य केले? नव्हे; असे घडले नाही. जर असे घडले असते तर पैगंबर (स.) यांची असीम सहनशीलता, दृढता, अद्वितीय दया व क्षमा-भावना, याशिवाय त्यांचे अगणित उच्चतम गुण पडद्या पाठीमागे अदृश्य राहिले असते आणि जगाला त्यांचा परिचय झाला नसता. पैगंबर (स.) यांना आरंभी तशाच अडचणी व कष्टांना तोंड द्यावे लागले जो प्रत्येक महान सुधारकांचा वाटा आहे. या महान सुधारकाला आपला सत्य-उद्देश सफल करण्यासाठी प्राणघातक यातना व कष्ट सोसावे लागले. तरीसुद्धा त्यांनी अद्वितीय दृढता व धैर्याचा त्याग केला नाही आणि निरंतर इस्लामचा प्रचार करीत राहिले. खरे ते सांगण्यास मागेपुढे केले नाही. शेवटी पैगंबर (स.) यांची ख्याति झाली व त्यांच्या जीवनातच संपूर्ण अरबस्थान सर्व वाईट गोष्टींपासून मुक्त व शुद्ध झाले."

पैगंबर (स.) यांच्या साहस, शौर्य, धैर्य व दृढतेने जगात मुस्लिमांसारख्या वीर व ईशउपासक जातीला जन्म दिला आहे. फार काळ लोटला नाही की जगात चोहीकडे तिची विजयपताका फडफडत होती, संपूर्ण जगात तिच्या नावाचा जयघोष होत होता आणि कोणतीही दुसरी जात तिचा सामना करू शकत नव्हती. हेच मुस्लिम आज इतके पतनशील व दिशाहीन का दिसत आहेत? त्यांच्या गळ्यात गुलामीचे जोखड पडलेले आहे? याचे कारण याशिवाय अन्य काही नाही की पैगंबर (स.) यांच्या शिकवणीपासून मुस्लिम अगणित कोस दूर हटलेले आहेत. पैगंबर (स.) यांचे नाव घ्यायला हवे तर आपली गमावलेली प्रतिष्ठा व गौरव पुन्हा प्राप्त करू शकतात. त्यासाठी त्यांनी मनापासून पैगंबर (स.) यांचे प्रबल धैर्य व दृढता, साहस व शौर्य आणि सदाचार व उदारता हे गुण पुन्हा ग्रहण केले पाहिजेत. मित्रांनो! मी दुसऱ्या धर्माच्या लोकांनादेखील प्रार्थना करतो की त्यांनी पैगंबर (स.) यांना आपला आदर्श बनवावे आणि त्यांच्या उत्तम शिकवणीनुसार वागून लाभान्वित व्हावे."

विश्वबंधुत्व व मानव-समानतेचे संस्थापक

दिल्लीचे सुप्रसिद्ध राष्ट्रीय नेता व दैनिक वर्तमानपत्र 'तेज'चे निर्देशक लाला देशबंधु गुप्त लिहितात -

"पैगंबर (स.) एक धार्मिक नेते होते. त्यांचे जवळ जवळ संपूर्ण जीवन इस्लामच्या प्रचारातच गेले. म्हणून त्यांची शिकवण वास्तविकत: इस्लामचीच शिकवण आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की मुस्लिमांशिवाय अन्य लोक त्यांच्या शिकवणीपासून लाभ घेऊ शकत नाहीत. अरबस्थानातील अर्धरानटी बद्दू लोकांवर त्यांनी जे उपकार केले आहेत त्यांचा इतिहासाला कदापि विसर पडू शकत नाही. जो देश आजपासून दीड हजार वर्षापूर्वी सभ्यता व संस्कृतीच्या नावानेदेखील अपरिचित होता, जेथे कला-कौशल्याचा ठावठिकाणा नव्हता, जेथील लोकांचा धंदाच मुळी लूटमार, खून व रक्तपात होता, जेथे मूर्तिपूजा व अंधविश्वासाचे साम्राज्य होते, तो देश आज सभ्य व सुसंस्कृत देशांच्या रांगेत उभा असलेला दिसत आहे. हा सर्व त्यांच्याच सद्प्रयत्नांचा सुपरिणाम आहे. याशिवाय इस्लामी बंधुत्वाचा उत्तम आदर्श स्थापित करून त्यांनी गात मानव समानतेच्या सन्मानपूर्ण भावनेला प्रोत्साहन दिले आणि हे एक असे महान कार्य होते की ज्याने केवळ इस्लामी देशांचाच कायापालट केला असे नव्हे तर अन्य देशांवरदेखील प्रभाव टाकला. पैगंबर (स.) यांचे एक अन्य महान व विशेष कार्य असे आहे की त्यांनी अरबस्थानातून गुलामीच्या मानवतारहित प्रथेचे उच्चाटन करण्यात फार मोठी मजल मारली आणि इस्लामच्या अनुयायांना उपदेश दिला की गुलामांना मुक्त करणे सर्वात महान पुण्यकार्य आहे आणि कोणत्याही माणसाला तो जन्मजात गुलाम असल्यामुळे धार्मिक नेता अथवा उच्च शासक बनण्यापासून वंचित केले जाऊ शकत नाही. इस्लामी इतिहास साक्षी आहे की अनेक जन्मजात गुलामांनी 'खलीफा'चे उच्च पद भूषवले आणि आपले सत्कर्म आणि उत्तम गुणामुळे आपल्या कारकीर्दीत इस्लामचे नेतृत्व केले. आज विसाव्या शतकात की जेव्हा जवळ जवळ संपूर्ण जगातून गुलामीच्या प्रथेचे उच्चाटन झाले आहे, शक्यता आहे की ही गोष्ट सामान्य वाटेल, परंतु आजपासून चौदाशे वर्षापूर्वीचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर ठेऊन विचार केल्यास, हे मान्य करावे लागेल की हे काही लहान-सहान कार्य नव्हते. अशा प्रकारचेच अनेक महत्त्वपूर्ण कार्य पैगंबर (स.) यांच्या जीवनाशी संबंधित आहेत ज्यांचे विस्तारपूर्वक वर्णन या लहानशा निबंधात करणे अशक्य आहे आणि त्याची गरजदेखील नाही. येथे केवळ इतकेच म्हणणे पुरेसे आहे की, पैगंबर (स.) जगातील त्या महानतम व्यक्तींपैकी एक आहेत

ज्यांच्या जीवनाचा उद्देश मानवजातीला सत्यमार्ग दाखविणे असतो. पैगंबर (स.) यांना आपला उद्देश पूर्ण करण्यात जितके यश मिळाले ते अशासाठीसुद्धा अधिक प्रशंसनीय आहे की त्यांना अरबस्थानच्या वाळवंटाला की जेथे इस्लामी जीवनासाठी आवश्यक प्रारंभिक साधनदेखील एकत्रित नव्हती, आपले कार्यक्षेत्र बनविणे भाग पडले आणि त्या निम्म्या रानटी जातीत कार्य करावे लागले. ही जात अशिक्षित, प्रकाशहीन आणि नैतिकता व सत्यतेपासून पूर्णत: दूर होती.'' - 'तर्जुमान बनारस' १९ जुलै १९३३

सरळ व सत्य पथप्रदर्शक

अविभाजित पंजाबचे प्रसिद्ध काँग्रेसी पुढारी व विद्वान डॉ. सत्यपाल लिहितात -

''जेव्हा पैगंबर (स.) यांचा उदय झाला तेव्हा संपूर्ण अरबस्थानात मूर्तिपूजा शिगेला पोचली होती, सर्वत्र शिर्क (अनेकेश्वरवाद) प्रचलित होता. ईश्वरावरील विश्वास लुप्त होत होता. अत्याचार, दमन व जोरजबरदस्ती व हिंसेसाठी तर ईश्वराला अवश्य विचारले जात होते, परंतु त्याच्या उपासनेपासून लोक फार दूर होते. वाईट संस्कार व धार्मिक पाखंडीपणाला ऊत आला होता. परंतु ईश्वराच्या आज्ञापालनाचे कुणीही नाव घेत नसे. अशावेळी त्यांनी या ज्ञानाने ईश्वराच्या एकत्वाची घोषणा केली की ज्याच्या प्रतिध्वनीने एक नवे जग अस्तित्वात आले. पैगंबरांना लोकांनी विभिन्न प्रकारे कष्ट दिले कारण ते अद्वितीय-एकमेव ईशसंदेश देत होते. त्यांना लोकांनी खूप त्रास दिला कारण ते एका उपास्यापुढे लोकांना आकर्षित करीत होते. परंतु असा अडचणींना महान व तेजस्वी लोक कुठे भितात? ते स्वत: ईश्वराजवळ असतात. ते जगवाल्यांचा कोठे विचार करतात? ते जगाला कुठे भितात, की ज्यांच्या मस्तकावर जगाच्या स्वामींचा हात आहे? जग त्यांना खरेदी करू शकत नाही. ते अपमानाने घाबरत नाहीत व प्रशंसेने मोहितसुद्धा होत नाहीत. त्यांच्या दृष्टीने या गोष्टींचे काहीही मूल्य नाही. सामान्य लोक असा विचार करतात की पैगंबर (स.) एका मुख्य संप्रदाय अथवा जात किंवा देशाचे मार्गदर्शक आहेत. हे सत्य आहे की आज कोटयवधी मुस्लिम दिवसातून अनेकवेळा अल्लाहच्या या पवित्र संदेशदात्याचे नाव श्रद्धा व प्रेमाने घेतात. परंतु त्यांचापेक्षाही अधिक ते लोक पैगंबरांचे प्रशंसक आहेत जे जरी माझ्यासारखे त्यांच्या घोषणेत आपला हळुवार आवाज सामील करतात आणि जे रात्रंदिवस पैगंबरांच्या या कृतीचे स्मरण ठेवतात की त्यांनी विस्मृती झालेल्या मार्गभ्रष्ट जगाला पुन्हा वास्तविक सत्यमार्ग दाखविला आणि शिकवण दिली.

जरी पैगंबर (स.) यांनी आपल्या जीवनात दुसरे काही केले नसते तरी त्यांनी दूर केलेला शिर्क (अनेकेश्वरत्व) व एकेश्वरत्वाची स्थापना एक अशी कीर्ति आहे की ज्यामुळे त्यांना चिरस्थायी जीवनाचा अधिकार प्राप्त झाला असता. परंतु पैगंबरांनी जगवासियांसाठी वर्तमान व भविष्यकाळात प्रगती करण्याकरितादेखील मार्गदर्शक प्रदीप प्रज्वलित केला आहे. त्यांचा आत्मत्याग, त्यांच्या आत्मसंयम, त्यांचा आत्मविश्वास, हे आम्हा सर्वांसाठी दीपस्तंभाचे कार्य करीत आहेत. पैगंबर (स.) यांनी जगात समानतेचा सिद्धान्त प्रचलित करून तो प्रत्यक्ष जीवनात कार्यान्वित करून दाखविला. त्यांना फर्माविले की अल्लाहपाशी सर्व मनुष्यांचा दर्जा एक समान आहे. त्याच्या दरबारात केवळ धन व बुद्धीला प्राधान्य दिले जात नाही, जो कोणी त्याचा झाला अल्लाहदेखील त्याचा झाला, निर्धन असो की सधन, राजा असो की प्रजा, ज्याने अल्लाहच्या आज्ञांचे पालन करणे हे आपल्या जीवनाचे लक्ष्य बनविले त्याने सर्वोच्च पद प्राप्त केले. अल्लाहच्या उपासनेचे द्वार सर्वासाठी खुले आहेत, उच्च-नीचतेचा भेद अयोग्य आहे. इतकेच नव्हे तर जगातील अन्य बाबतीतसुद्धा पैगंबर (स.) यांनी आपापसात समानतापूर्ण व्यवहार करण्याचा आदेश दिला आहे.'' - 'तर्जुमान'-काशी, जुलै १९३० इ.

जगासाठी दयानिधी

दिवंगत महात्मा गांधींचे कनिष्ठ पुत्र मिस्टर देवदास गांधी आपल्या एका निबंधात लिहितात -

''एक महान शक्तिशाली सूर्यासमान ईशदूत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अरबस्थानच्या वाळवंटाला त्यावेळी प्रकाशमान केले जेव्हा मानवी जग घोर अंधारात बुडालेले होते आणि जेव्हा ते परलोकवासी झाले तेव्हा त्यांनी आपले कार्य पूर्ण केले होते. ते पवित्रतम कार्य होते की ज्याने जगाला कायमस्वरूपी लाभ होणार होता. जगाचे खरे पथप्रदर्शक फारच थोडे झालेले आहेत आणि त्यांच्या युगात एक दुसऱ्यापासून फार अंतर होते आणि ते लोक की ज्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्राचा तसाच श्रद्धापूर्वक अभ्यास केला आहे ज्याचे ते अधिकारी आहेत, त्यांना ही गोष्ट मान्य करावीच लागेल की ते महान धर्मोपदेशकांपैकी एक होते. त्यांच्या महानता व श्रेष्ठत्वात त्या वेळी आणखी वाढ होते जेव्हा त्यांचे व्यक्तिचित्र रेखाटताना आम्ही त्या नितांत आध्यात्मिक व नैतिक ऱ्हासाच्या पृष्ठभूमीवरदेखील दृष्टी ठेवतो जी त्यांच्या जन्मावेळी अरबस्थानात विद्यमान होती.

पैगंबर एका सभ्य व उन्नतिशील वातावरणाची उपज नव्हते. त्यांच्या काळात एक मनुष्यदेखील असा नव्हता की ज्याच्याकडून त्यांनी ब्रह्मवादाचे शिक्षण घ्यावे. त्या काळात ईश्वरी धर्माला तर स्थानच नव्हते. तो देश आपल्या अंध:कार काळातून जात होता. जेव्हा दुराचार व पतन चरमसीमेला पोचला तेव्हा ते ईश्वरी दया बनून उदयास आले. अशा स्थितीत जर त्यांना 'रहमतुल्लिल आलमीन' (जगासाठी दया-निधी) ची पदवी दिली जाते तर त्यात आश्चर्याची कोणती गोष्ट आहे?

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा संबंध एखाद्या श्रीमंत कुटुंबाशी नव्हता. त्यांचे आई-वडील निर्धन होते आणि आध्यात्मिक श्रेष्ठत्वदेखील त्यांना वंश परंपरेने मिळालेले नव्हते. त्यांचा जन्म एका अशा कुटुंबात झाला ज्याचे सांपत्तिकदृष्टया काहीही महत्त्व नव्हते आणि माझ्या दृष्टीने त्यांच्या जीवनात सर्वात महत्त्वाची व मनोहर गोष्ट आहे ती अशी की दुसऱ्या महान व्यक्तींप्रमाणे त्यांचा जन्म अशा वर्गात झाला ज्याला सामान्य वर्ग म्हटले जाते. त्यांनी एका सामान्य व्यापारी व शेळ्या चारणाऱ्याचे जीवन व्यतीत केले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सर्वप्रथम वैशिष्ट्य ज्याने लोकांच्या हृदयांना मोहित केले. ते म्हणजे त्यांचा प्रामाणिकपणा होय. त्यांच्या या वैशिष्ट्याने त्यांना 'अल् अमीन' (ठेवींचा रक्षक) सारखा हेवा वाटावा असे पद प्राप्त करून दिले. याचा अर्थ प्रामाणिक व खरा आहे. खरेपणावर त्यांचा ईमान होता आणि त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक विभागात याची ज्योत दिसून येते. कोणत्याही स्थितीत ते खरेपणाविरुद्ध कोणतीही गोष्ट सहन करू शकत नव्हते. चांगल्या उद्देशानेदेखील सत्य व न्यायाविरुद्ध कोणतेही कार्य पसंत करीत नसत. याचे उज्वल उदाहरण 'बदर'च्या युद्धातील या घटनेत दिसून येते. त्यांच्या शत्रू टोळ्यांनी त्यांच्या दोन सोबत्यांना पकडले आणि अशी प्रतिज्ञा घेऊन सोडून दिले की ते पैगंबर मुहम्मद (स.) यांना साथ देऊन कुरैश लोकांनी युद्ध करणार नाहीत. बदरच्या युद्धात शत्रूंची संख्या त्यांच्यापेक्षा फार मोठी होती आणि एक योद्धा कमी अथवा जास्त झाल्याने त्यांच्या युद्धविषयक स्थितीत फार मोठे बदल आणू शकत होते. परंतु इतकी अधिक निकड असताना व त्या लोकांनी नम्र प्रार्थना केली असतादेखील पैगंबरांनी हे पसंत केले नाही की त्या लोकांनी आपली प्रतिज्ञा मोडून त्यांना साथ द्यावी. सामाजिक लाभ घेणाऱ्या सिद्धान्ताचे त्यांच्या दृष्टीने काहीही महत्त्व नव्हते. आपल्यासाठी प्राणाचा त्याग करण्यास तयार असलेल्या मित्रांना त्यांची हार्दिक इच्छा पूर्ण करण्यापासून वंचित ठेवण्यात त्यांना अवश्य दु:ख झाले असेल. परंतु सत्य व न्यायासाठी हे सहन केले गेले.

प्रत्येक स्थितीत एका नैतिक नियमाचे पालन आवश्यक होते. मग त्यामुळे हृदयाला कितीही त्रास का पोचेना कारण हे आवश्यक होते की ज्या उच्च नैतिक आदर्शाकडे पैगंबर आपल्या जातीला बोलवू इच्छित होते त्यावर प्रथम स्वत: चालून दाखवावे. सत्य असे आहे की त्यांनी हा आदर्श प्रस्तुत करण्यात थोडादेखील संकोच केला नाही.

त्यांचे आदर्श जीवनचरित्र आम्हाला दर्शविते की त्यांनी आपल्या उपदेश व प्रचाराचा आयुष्यभर हाच नियम ठेवला की जे काही ते आपल्या अनुयायांना शिकवू इच्छित होते ते सर्व काही आपण स्वत: करून दाखवीत असत आणि कधीही कोणत्या अशा कार्याची शिकवण देत नसत ज्यांचे उदाहरण त्यांनी उपस्थित केलेले नसावे.

त्यांच्या पवित्र जीवनात त्यावेळीसुद्धा कोणत्याही प्रकारचे काहीही अंतर आले नाही जेव्हा त्यांनी पैगंबर पदविभूषित केले. त्यांनी संपूर्ण जीवन त्याच सरळपणा व साधेपणाने व्यतीत केले. सांसारिक सुख व जीवनाचे भोग-विलास त्यांना त्यावेळीसुद्धा आपल्याकडे आकर्षित करू शकले नाहीत जेव्हा एकापेक्षा अधिक साम्राज्यांची धन-संपत्ती त्यांच्या चरणात अर्पित होत होती. त्यांचे जेवण फारच साधे व थोडे होते आणि तेही केवळ जिवंत राहण्यासाठी खात होते. चटई व तटकर त्यांचे अंथरूण होते आणि अशाच प्रकारे त्यांचे परिधान करावयाचे कपडेसुद्धा फार साधे होते. त्यांनी कधीही कोणालाही कटु शब्द वापरले नाहीत, येथपावेतो की युद्धप्रसंगीसुद्धा शत्रूशी बोलताना त्यांचा स्वर अत्यंत कोमल असे. वास्तविकता अशी आहे की त्यांना आपल्या इच्छा व मनातील भावनांवर पुरेपूर नियंत्रण होते. गीतेत कर्मयोगीचे जे गुण सांगितले आहेत ते सर्वच्या सर्व पूर्णपणे त्यांच्यात आढळत होते. ते आपली अप्रिय कर्तव्येसुद्धा खऱ्या ईमानाने व वीरतापूर्वक पूर्ण करीत असत आणि इच्छा व गर्व कधीही त्यांच्या पायांना कंपित करू शकत नसत. कर्मयोगी त्या मनुष्याला म्हणतात जो आपल्या उत्तम विचारांना प्रत्यक्षात आणतो आणि पैगंबर मुहम्मद (स.) एक असलेच पुरुष होते. एक नश्वर मनुष्य असूनदेखील त्यांच्यात अलौकिक गुण होते. सुख-दु:ख, हर्ष क्षोभ की ज्यांच्या प्रभावात आम्हा सामान्य लोकांचे जीवन व्यतीत होते आणि वास्तविकत: जे आमच्या जीवनात क्रांति उत्पन्न करतात, त्यांच्यामुळे हा पवित्रतम व महान आत्मा प्रभावित होत नसे. त्यांचे जीवन गीतेच्या या स्तुतीचे बिनचूक प्रतीक होते. जी पैगंबर व अवतारांची यात केली गेली आहे की, 'तो या स्थानापर्यंत पोचतो जेथे सर्व इच्छा अशाप्रकारे त्याच्याकडे वाहतात ज्याप्रकारे नद्या समुद्राकडे वाहतात. तो जरी पाण्याने पूर्ण भरलेला असतो पण या नद्या त्यात थोडेदेखील कंपन उत्पन्न करू शकत नाहीत.

असे घडत नाही की त्याने इच्छेने प्रभावित होऊन इच्छा करू लागावे. त्याची सर्व कार्ये लोभ व नावाच्या साच्यातून स्वतंत्र असतात आणि त्याच्या कार्यांना ज्ञानाची ज्वाला तापवून कुन्दन बनविते' - गीता

जे लोक समाजाची वर्तमान व्यवस्था व प्रणालीला परिवर्तित करण्यात लागले आहेत आणि इच्छा करतात की यातून चांगल्या समजाचा जन्म व्हावा तर त्यांच्या मनावर ज्या गोष्टीचा प्रभाव पडेल तो पैगंबर मुहम्मद (स.) यांचा तो उच्च आदर्श आहे जो त्यांनी परिश्रम व मजुरीच्या संबंधाने कायम केला आहे. या ईशदूताने अशी अनेक अनुकरणीय उदाहरणे स्थापित केली आहेत, जी लोक विसरून गेले आहेत. त्यापैकी एक असे आहे की, ते स्वतःचे कपडे स्वतःच शिवत असत. इतकेच नव्हे तर स्वतःच्या जोड्यांना स्वतःच टाके मारीत असत. घरातील कामात ते नेहमी आपल्या सेवकांना मदत करीत असत. मस्जिद बांधताना त्यांनी मजुरांबरोबर काम केले. मजुरांसमवेत काम करताना ते त्यांच्यात अशाप्रकारे मिसळत असत की त्यांना कोणी ओळखू शकत नसे.

मुलांवर त्यांचे विशेष प्रेम होते आणि त्यांच्या सान्निध्यात ते फार प्रसन्न राहत असत. ती सौभाग्यवान मुले जी त्यांच्या जीवनकाळात होती आणि ज्यांना त्यांचे प्रेम प्राप्त झाले ती आपल्या घरात इतकी आनंदी राहत नसत जितकी त्यांच्याबरोबर राहत असत. मुलांच्या सान्निध्यात उठणे-बसणे त्यांच्यासाठी काही योगायोगाची गोष्ट नव्हती, तर हा त्यांचा नियम व कार्यक्रम होता की मुलांना शोधून ते त्यांच्याबरोबर राहत असत आणि आपले उत्तम विचार त्यांच्या डोक्यात घालीत असत. शिक्षण देण्याची व उपदेश करण्याची यापेक्षा अधिक स्वाभाविक व सोपी पद्धत अन्य एखादी असू शकते का?

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनाचा महत्त्वपूर्ण विषय त्यांचा दयाळूपणा व क्षमाभावना होता, जो सर्रास त्या लोकांसाठी होता ज्यांनी त्यांना यातना दिल्या, कष्ट दिले, विभिन्न प्रकारच्या शिक्षा दिल्या. येथपावेतो की त्यांना ठार करण्यासाठी अशा पद्धती अवलंबिल्या ज्या ऐकल्यास अंगावर शहरे येतात. परंतु त्या सर्व विरोधांना त्यांनी शांतीपूर्वक सहन केले. त्यांचा सदैव असा विश्वास होता की अशा प्रकारचे कष्ट सहन करून ते त्या महान उद्देशाची पूर्तता करीत आहेत जो त्यांच्या सुपूर्द केला गेला होता. असा विचार की त्यांची ही सहनशीलता व शांतीपूर्वक राहणे त्यांच्यात साहस व वीरता नसल्यामुळे होते अशासाठी तुच्छ व स्वीकार करण्याजोगा नाही की एकापेक्षा अधिक प्रसंगी नियमित युद्धात, की जी करण्यात त्यांना भाग पाडले गेले, त्यांनी असीम साहस व

शौर्याचा परिचय दिला.

जीवनातील अशा प्रत्येक प्रसंगी, जेव्हा सामान्य मनुष्य आपली असमर्थता प्रकट करतो, ते अलौकिक साहसाने उठले व मार्गभ्रष्ट अरबांना कल्याणाचा मार्ग दाखविला. हे सत्य आहे की ते एक मनुष्य होते. मुस्लिम त्यांना मनुष्य असल्याचे मानतात, ईश्वर नव्हे, तर मानव जातीतील एक व्यक्ती समजतात. वास्तविकत: ते एक मनुष्यच होते. परंतु आम्हाला हे अवश्य समजून घेतले पाहिजे की ते एक असले मनुष्य होते जसा की वास्तविक एक मनुष्य असला पाहिजे अथवा जसा की ईश्वराने मनुष्याला बनवू इच्छिले होते, आम्हा सर्वांसारखा मनुष्य नव्हे. तेराशे वर्षांपूर्वीच्या या महामानवाच्या चरणावर आजसुद्धा जगाच्या विभिन्न भागातील कोट्यवधी लोक श्रद्धांजली अर्पित करीत आहेत. मानवतेचा हा पूर्णतम आदर्श एका प्रकाशमान सूर्याप्रमाणे या जगात आला होता आणि तो आपल्या कोट्यावधी प्रेमीजनांच्या हृदयांत सूर्याप्रमाणेच सदैव प्रकाशमान राहील.''   - मासिक पेशवा, दिल्ली, जुलै १९३१ इ.

माझे डोळे उघडले

'बाबू मुकुटधारी प्रसाद (बी.ए.एलएल.बी.)' हे गयाचे प्रमुख राष्ट्रीय पुढारी आहेत. त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात अनेक वेळा कारावास भोगला आहे आणि बारा वर्षे ते गया म्युनिसिपलचे अध्यक्ष राहिलेले आहेत. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जन्म-दिनानिमित्त भरलेल्या सभेच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना ते म्हणाले -

''आपल्याला हे माहीत असेल किंवा नसेल, परंतु सत्य असे आहे की, इस्लाम व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या बाबतीत पूर्वी माझे विचार तितकेच चांगले नव्हते जसे की, आज आपण पाहता. माझे मन त्यांच्याबद्दल असलेल्या द्वेषाने भरलेले होते आणि मला पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्या इस्लाममध्ये कोणतेच गुण आढळत नव्हते. परंतु जेव्हा मी असहकार आंदोलनात तुरुंगात गेलो तेव्हा मी त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास केला तेव्हा माझे डोळे पार उघडले आणि मला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यातील अपार गुण मानावे लागले आणि याच कारणामुळे आज मी हे उच्च पद ग्रहण केले आहे.

अरबस्थानच्या इतिहसावरून स्पष्ट आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या धर्मप्रचारापूर्वी अरब लोक अत्यंत मूर्ख, रानटी, मार्गभ्रष्ट होते. दारू पिणे व अनेक प्रकारचे दुष्कर्म करण्यात मग्न होते. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीचा

असा परिणाम झाला की २३ वर्षांच्या अल्प काळात या मूर्ख व रानटी देशाचा कायापालट झाला. त्यांच्या शिकवणी अगणित आहेत, परंतु यापैकी विशिष्ठ शिकवणी मला अत्यंत प्रिय आहेत आणि प्रत्येक माणसाच्या दृष्टीने लाभकारी व व्यवहार-योग्य आहेत. त्यांचे मी वर्णन करतो.

सर्वप्रथम मी इस्लाममधील समानतेला घेतो. स्वामी असो की दास, धनी असो की निर्धन, गोरा असो की काळा, इस्लामने प्रत्येक मुस्लिमाला बरोबरीचा दर्जा दिला आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीत पारिवारिक उच्च-नीचतेला काहीही वाव नाही, तर नाव व प्रतिष्ठा प्राप्त करण्याची कसोटी केवळ कर्म आहे.

आता आपण वारसापद्धत व जकात समजून घेऊ या. माझ्या मते पैगंबर मुहम्मद (स.) यांनी या बाबतीते जे आदेश दिले आहेत त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की इस्लाम भांडवलशाही विरूद्ध व धन विभाजनाचा समर्थक आहे. वारसा नियमाचा अर्थ याशिवाय अन्य काही होऊ शकत नाही की एका व्यक्तीचे धन काही लोकांत वाटले जावे आणि त्या कुटुंबाचा प्रत्येक सदस्य निर्धनतेपासून सुरक्षित राहावा आणि त्याचबरोबर कोणा एकाला संपत्तीचा गर्व घडू नये व त्याने आपल्या तुलनेत इतरांना हीन समजू नये.

जकात (केवळ मुस्लिमांकडून घेतला जाणारा धार्मिक कर) या कराला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीत फार मोठे प्राधान्य आहे, हा कर इतर कोणत्याही धर्मात नाही. संपत्ती-विभाजनामुळे एका कुटुंबाच्या सदस्यांच्या आर्थिक अडचणी दूर होऊ शकत होत्या. परंतु जकातने भांडवशाहीच्या विरोधाबरोबरच एका दशाहीन व निर्धन मुस्लिमाला निर्धनतेच्या गर्तेतून बाहेर काढले आणि जगात मनुष्यासारखे जीवन जगण्याची संधी प्रदान केली. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीप्रमाणेच त्यांचे आचरणदेखील अत्यंत उच्च कोटीचे होते. याचे एक लहानसे उदाहरण असे आहे की, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या एक सुकन्या जेव्हा गर्भवती होत्या तेव्हा इस्लामच्या एका विरोधकाने त्यांना भाल्याने जखमी केले आणि त्यामुळे त्यांचा गर्भपात झाला आणि त्या वेदनेने त्या जिवंत राहू शकल्या नाहीत. परंतु जेव्हा तोच विरोधक एका प्रसंगी अपराधी म्हणून त्यांच्या समोर हजर केला गेला तेव्हा त्यांनी आपल्या असीम दयाळूपणा, धैर्य व क्षमा-भावनेचा परिचय देऊन अशा मोठ्या अपराध्याला काहीही शिक्षा न देता त्याला मुक्त केले.

सज्जनहो! असे म्हटले जाते की इस्लामचा प्रसार तलवारीच्या जोरावर झाला, आपल्याला हे ऐकून आश्चर्य वाटेल की माझासुद्धा असाच विचार होता. परंतु ती कोणती तलवार होती? काय ती पोलादी तलवार होती? नव्हे, ती पैगंबर मुहम्मद (स.) यांची हीच अमूल्य सच्चरित्रता, क्षमा-भावना, शुद्ध आचार-व्यवहार, त्यांचे महान गुण आणि त्यांची कयामत (अंतिम दिन) पर्यंत न नष्ट होणाऱ्या त्यांच्या आदर्श शिकवणींची चमकणारी व तळपणारी तलवार होती जिने डोकी उडविण्याऐवजी हृदयांना एका सूत्रात जोडण्याचे काम केले. इस्लामच्या लोकप्रियता व प्रसिद्धीची हीच ती कारणे आहेत एखादी गोष्ट जी बळाने व अत्याचाराने प्रस्थापित केली जाते, ती टिकाऊ व फलद्रुप होणारी नसते. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अत्युत्तम शिकवणी व सदाचाराचेच हे चमत्कार आहेत की इस्लाम अद्याप टिकून आहे आणि मला हे स्वीकार करताना काहीही संकोच वाटत नाही की पैगंबर मुहम्मद (स.) यांचाच इस्लाम धर्म आपल्या शिकवणींच्या बळावर आज जगातील सर्वात अधिक लोकप्रिय धर्म आहे.''

- जगत महर्षि - पृष्ठ ६२-६८

मानवजीवनाचा सर्वोत्तम आदर्श

राजा राधाप्रसाद सिंह बी.ए.एलएल.बी. तिलेथ स्टेटमधील पैगंबर जयंतीनिमित्त आयोजित एका सभेत भाषण करताना म्हणतात -

''विश्व भूगोल व इतिहासाची पाने व जगाचा कोणताही भाग व कोपरा असेल एखादे उदाहरण प्रस्तुत करू शकत नाही की जेथे निसर्गाने प्रत्येक समाज, प्रत्येक धंदा व प्रत्येक जातीच्या चरित्र व स्वभावाच्या सुधारणेसाठी व चरित्र निर्मितीसाठी एखादा नबी (पैगंबर), अवतार, पथप्रदर्शक, हादी (उपदेश करणारा) अथवा पैगंबर (संदेशवाहक) पाठविलेला नसावा. 'वलिकुल्लि क़ौमिन हाद' ही आयत या गोष्टीची साक्ष देते की निसर्गाने प्रत्येक कोपरा व प्रत्येक भागात मग ती पूर्वेला असो की दक्षिणेला कोणता न कोणता जातीची सुधारणा करणारा देशाच्या व समाजाच्या उन्नती व नैतिक विकासासाठी उत्पन्न केला. जर आम्ही एखाद्या सुधारक, नबी (पैगंबर) अथवा अवताराच्या जीवनचरित्र अथवा जीवनघटनांचा पूर्ण शोध केला तर आमच्या दृष्टीसमोर त्याच्या जीवनाच्या सर्व घटना व वातावरण येऊ शकत नाही. परंतु हे वैशिट्य प्रामुख्याने सद्गुणांचे स्रोत पैगंबर मुहम्मद (स.) यांनाच प्राप्त आहे. त्यांच्या जीवनचरित्राचा संक्षिप्त अभ्यासावरून त्यांच्या जीवनाचे स्पष्ट चित्र आमच्या डोळ्यांसमोर उभे राहते. जर या पवित्र आत्म्याच्या यंत्र-तंत्र घटनांवरदेखील प्रकाश

टाकला तर याकरितादेखील एका मोठ्या ग्रंथाची गरज भासेल. हा संक्षिप्त निबंध तर यासाठी कोणत्याही स्थितीत पुरेसा ठरू शकत नाही की या साकार ज्योती व खरेपणा आणि स्वच्छतेच्या मूर्तीचा आदर्श आचार-व्यवहार, ज्याच्या संबंधाने 'तुमच्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवन सर्वोत्तम आदर्श आहे' असे म्हटले आहे, प्रस्तुत केला जावा. यावेळी नमुना म्हणून काही प्रमुख व स्पष्ट घटना सांगतो. या घटना श्रोत्यांच्या आत्म्याला ताजेपणा प्रदान करतील.''

यानंतर राजा राधाप्रसाद सिंह यांनी पैगंबरांच्या सच्चरित्राची महानता 'समता व सत्यता', 'धैर्य व दृढता', 'दया व बंधुत्व' या मथळ्याखाली त्यांच्या सच्चरित्राच्या विभिन्न पैलूंवर प्रकाश टाकल्यानंतर 'बंधुत्व व समता का अद्वितीय मुकुटधारी' या मथळ्याखाली लिहितात -

''वास्तविकत: त्यांचीच एक अशी शिकवण आहे जिने जातपातीच्या बंधनांना योग्य ठरविले नाही. त्यांची शिकवण आहे की संपूर्ण मानवजात मग ते लोक गौरवर्ण असोत की श्यामवर्ण, धनवान असोत की निर्धन, प्रबळ असोत की निर्बळ, सभ्य समाजाशी संबंध ठेवणारे असोत की असभ्य अथवा अन्य काही असो सर्व बरोबरीचे आहेत आणि सर्वांना समान अधिकार आहेत. त्यांच्या शिकवणीनुसार ईश्वराच्या दृष्टीने सामान्य मनुष्य व मोठ्यात मोठा सम्राट दोघांचा दर्जा एकच आहे, कारण त्याच्या दरबारात व्यक्तित्वाची विचारणा होत नसते. तेथे फक्त सत्कर्मांची आवश्यकता आहे. यावरच सर्व सभ्यता व मोठेपण अवलंबून आहे.

मी एक पाऊल पुढे जातो आणि अंतत: हे सांगितल्याशिवाय राहू शकत नाही की येथपर्यंत मी स्वत:च्या धर्माचे ग्रंथ व दुसऱ्या धर्माच्या संस्थापक व महान सुधारकांच्या शिकवणींचा अभ्यास केला आहे त्यात मला कोठेही समानतेचा इतका प्रबळ व स्पष्ट आदेश मिळाला नाही जितका प्रभावी स्पष्ट व नि:संदिग्ध शब्दांत पैगंबरांनी आदेश दिला आहे. विभिन्न जाती, वंश व धर्मांत एक बंधुत्व संबंध प्रस्थापित करणे त्यांच्यापूर्वी संभवत: कधीही व कोठेही पाहण्यात आले नाही हा त्यांच्याच कल्याणमय शिकवणीचा प्रभाव आहे व जातीभेद मिटवून त्यांनी सर्वांना बंधुत्वाच्या बंधनात बांधले. आदरणीय पैगंबरांची हीच लोकसमता व बंधुभावाची चित्ताकर्षक व जीवनवर्धक शिकवण आहे जिने माझ्या मनावर खोलवर प्रभाव टाकला आहे आणि तो पहिलाच हृदयग्राही व आकर्षक उपदेश आहे जो मानवाला मोहित करतो.'' - जगत महर्षि - पृष्ठ २१-३४

महानतम नेता

श्री. बी. एन. साहनी, संपादक 'हिंदुस्तान टाइम्स' दिल्ली, आपल्या 'गलत मजहबों का काफिर' या लेखात लिहितात -

''आपापल्या युगात पैगंबर मुहम्मद (स.), इसा (येशू ख्रिस्त) व बुद्धासारख्या महात्म्यांशी त्याच प्रकारचा घृणापूर्ण व तिरस्कारयुक्त व्यवहार केला गेला जो अधर्मियांकडून (खोट्या धर्म उपासकांकडून) खऱ्या धर्म प्रवर्तकासाठी विशेष आहे आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांना अशाच धर्माचा महान नेता समजून मी बाध्य झालो की त्यांचा सन्मान करावा.

हे केवळ त्यांचेच कार्य होते की अद्वितीय धैर्य व दृढतेने, की ज्यामुळे ते कित्येक वेळा मृत्यूच्या तोंडापर्यंत पोचले, त्यांनी त्या काळाच्या प्रचलित धर्म सिद्धान्तांचा भंग केला आणि एका अशा धर्माचा पाया घातला ज्याने त्या काळच्या संस्कृतीतदेखील महत्त्वपूर्ण क्रांती उत्पन्न केली आणि पुढे जाऊन या जगाच्या विभिन्न भागांत बसणाऱ्या कोट्यवधी लोकांसाठी मार्गप्रदीप म्हणून उपयोगी पडला.

हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही की इस्लामच्या प्रवर्तकाचे व्यक्तित्व जितके पवित्र व उत्तम होते, त्यात तितकीच आकर्षण शक्तीदेखील होती आणि ते अशा हृदय व बुद्धीचे स्वामी होते, ज्याचे उदाहरण आजतागायत या जगात फार कमी आढळते. या पवित्रात्मा पैगंबरांनी शेकडो वर्षांपूर्वी आपल्या अनुयायांकरिता जी जीवनव्यवस्था ठरविली होती त्यातील दोन गोष्टी विशेषकरून प्रत्येक व्यक्तीचे लक्ष वेधून घेतात. ही गोष्ट किती आश्चर्यकारक आहे की लोकतंत्राच्या या युगातदेखील आम्ही सामाजिक व बौद्धिक समतेच्या त्या उच्च स्तरार्यंत पोचू शकलो नाही, ज्याची कल्पना या महान पैगंबरांच्या डोक्यात शेकडो वर्षांपूर्वी आली होती आणि जगातील मुस्लिमांनी एका जातीच्या रूपात आपल्या दैनिक जीवनात आश्चर्यजनक निष्ठेने त्याची अंमलबजावणी केली आहे.

राजनीतिक लोकतंत्रातसुद्धा बरीचशी वैशिष्ट्ये आहेत आणि ही वास्तविकता आहे की ते प्रत्येक राजनीतिक विधान (कायदा) जे जनतेचे ते राज्य स्थापण्यास पूर्ण स्वातंत्र्य देत नसेल, ज्याच्या अधीन ते जीवन जगू इच्छितात, तर नि:संदेह ते अन्यायपूर्ण व निरंकुश आहे. परंतु केवळ राजनीतिक लोकतंत्राने काम भागत नाही आणि लोकतंत्रात्मक जीवनपद्धतीची याने पूर्तता होत नाही. लोकतंत्राचे रहस्य ज्या गोष्टीत

लपलेले आहे ती तर अशी आहे की एका मनुष्याच्या दृष्टीत दुसऱ्या माणसाची किती प्रतिष्ठा आहे आणि एक समाज दुसऱ्या समाजाशी कसा व्यवहार करीत आहे?

जगातील सर्व धर्मांत केवळ इस्लामच एक असा धर्म आहे जो या गोष्टीची घोषणा करू शकला की त्याला लोकतंत्राचा खरा संदेश व खरा संदेशदाता (पैगंबर) मिळाला आहे.

इस्लाममधील सर्वात अधिक उल्लेखनीय ते अधिकार आहेत जे त्याने स्त्रियांना दिल आहेत. हे सत्य आहे की जेथपावेतो समाजात स्त्रियांचा दर्जा व पुरुषांशी मिळण्या-मिसळण्याच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आहे दोन्ही धर्म इस्लाम व इसाईयत (ख्रिस्ती धर्म) यांनी स्त्रियांना खूप स्वातंत्र्य दिले आहे; परंतु वारसाहक्क (कोड), खुला (पत्नीच्या मागणीवर पतीशी संबंधविच्छेद) संपत्ती व मिळकतीच्या कायदेशीर अधिकारासंबंधी इस्लामचे संस्थापक व प्रवर्तकांनी स्त्रियांना असले स्वत्व प्रदान केले आहेत जे आज प्रत्येक देशाचे धार्मिक नेते आपल्या स्त्रियांना देऊ इच्छितात.''

- मासिक 'पेशवा' दिल्ली, जुलै, १९३१ इ.)

–o– (समाप्त) –o–